मा.अति.महा.आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका,
ठराव क्र:-१/ १०६
दिनांक :- १०/५/२०२१.

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जा. क्र :-अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था४/११८५
दिनांक :- १०/०५/२०२१

## -: आदेश :-

विषय : मा. महापालिका आयुक्त यांचे प्रशासकीय नियंत्रणाखालील "वरिष्ठ लिपीक" व "लिपिक टंकलेखक" या संवर्गातील सेवकांना लेखा परीक्षण विभागाकडील "वरिष्ठ लिपीक" पदावर रूजू होणेसाठी कार्यमुक्त करणेबाबत.

संदर्भः १)लेखापरीक्षण विभाग, जा.क्र.मुलेप/२८३ दि.०४/०५/२०२१ चे आज्ञापत्र.
२)मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र.१/१०५दि.१०/०५/२०२१

मा. महापालिका आयुक्त यांचे प्रशासकीय नियंत्रणाखालील खाली नमुद केलेल्या विविध खात्यांकडील सेवकांना, मा. मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखालील, लेखापरीक्षण विभागाकडे वरिष्ठ लिपीक या पदांवर संदर्भ क्र. १ चे आज्ञापत्रानुसार रूजु होण्यासाठी सध्याच्या खात्यातून व पदांवरून या आज्ञापत्राचे दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | सध्याचा हुद्दा | सध्याचे खाते |
|---|---|---|---|
| १. | श्री. दळवी सचिन चंद्रकांत | वरीष्ठ लिपीक | कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालय |
| २. | श्री. ढाकोळ रमेश दत्तात्रय | वरीष्ठ लिपीक | आस्थापना विभाग |
| ३. | श्रीमती संत स्वाती विवेक | वरीष्ठ लिपीक | मुख्य लेखा व वित्त विभाग |
| ४. | श्रीमती देशपांडे प्राची प्रदीप | वरीष्ठ लिपीक | मुख्य लेखा व वित्त विभाग |
| ५. | श्रीमती जगताप राधिका विकास | वरिष्ठ लिपीक | आस्थापना विभाग |
| ६. | श्रीमती निकम वसुधा संदीप | लिपिक टंकलेखक | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालय |
| ७. | श्रीमती कावरे स्मिता संजय | लिपिक टंकलेखक | चाळ विभाग |
| ८. | श्रीमती मुसरिफ प्रियांका अतुल | लिपिक टंकलेखक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय |
| ९. | श्री. शिंदे विघ्नहर पिराजी | लिपिक टंकलेखक | सुरक्षा विभाग |
| १०. | श्री. भांडवलकर सतिश विश्वनाथ | लिपिक टंकलेखक | येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय |
| ११. | श्री. गायकवाड सिद्धार्थ युवराज | लिपिक टंकलेखक | मुख्य लेखा व वित्त विभाग |
| १२. | श्रीमती कुलकर्णी अस्मिता विवेकानंद | लिपिक टंकलेखक | मुख्य लेखा व वित्त विभाग |
| १३. | श्रीमती जागडे अश्विनी समीर | लिपिक टंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |

१. वरील सेवकांना या आज्ञापत्रान्वये लेखापरीक्षण विभागाकडे रूजु होणेसाठी संबंधित खातेप्रमुख यांनी कार्यमुक्त केलेबाबतचे निवेदन सामान्य प्रशासन विभागाकडे तात्काळ सादर करावे.

२. लेखापरीक्षण विभागाकडील नेमणूक स्वीकारल्यामुळे उपरोक्त सेवकांचे मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखालील प्रशासन विभागाकडील सेवा, सेवाज्येष्ठता, पदावरील धारणाधिकार इ. बाबतचे हक्क संपुष्टात येतील, तसेच संदर्भ क्र. १ चे आज्ञापत्रातील अटी त्यांचेवर बंधनकारक राहतील याची स्पष्ट जाणीव संबंधितांस करून देण्यात यावी, व त्याप्रमाणे मान्य असल्याचे त्यांचेकडून लेखी पत्र घेऊन त्याची एक प्रत सामान्य प्रशासन विभागाकडे त्वरित पाठवावी.

३. मात्र या नेमणूकीने त्यांचे वार्षिक वेतनवाढीवर कोणताही परीणाम होणार नाही.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. त्यानुसार उपरोक्त आदेशांतील ज्या सेवकांची तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर तदर्थ पदोन्नतीने नियुक्त कर्मचाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे अंतिम निकालाचे अधीन लेखापरीक्षण विभागाकडे बदलीने/बढतीने कार्यमुक्त करण्यात येत आहे.

५. या आदेशाची नोंद संबंधित सेवकांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

६. उपरोक्त आदेशांतील अ.क्र. १३ वरील श्रीमती जागडे अश्विनी समीर यांची सध्यस्थितीत कोरोना साथीचे आजाराचे प्रतिबंधात्मक कामकाजासाठी आवश्यकता असल्याने, पुढील आदेशापर्यंत त्यांनी "प्रत्यक्ष कामकाज" सामान्य प्रशासन विभागाकडे करायचे आहे.

७. वरील सेवकांचे लेखापरीक्षण विभागाकडील नियुक्तीचे संदर्भ क्र. १ चे आज्ञापत्राची प्रत पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर "कार्यालयीन परिपत्रक" प्रणालीमध्ये उपलब्ध आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी पुढील जरुर ती कार्यवाही करावी.

Rubal 10/5/21

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत : संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना---